नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७२/२०१७

निशाण क्र. ७० लगत

**प्रतिवादी क्र. १ चा उलट तपास वादी तर्फे विधिज्ञ श्री.एल.एल.नाथगोसावी यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

दावा मिळकतीचा स.नं. हि.नं. मला लक्षात नाही. माझ्या वडीलांच्या मालकीची चेंबूर मध्ये जागा असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी याकामी दिलेला नाही. हे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र. २ हे अधुन मधून गावी येवून जावून असत. दावा मिळकतीत ज्या आंबा कलमे व काजू कलमे आहेत त्याचे सव्र्हे वर्णन मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीमधील झाडे कोठून आणली त्याबाबतचा पुरावा मी दिलेला नाही. सरतपासातील परिचछेद क्र. ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दावा मिळक्तीत मी लावलेल्या कलमांचा खर्चाचा तपशिल देण्यास मला काही अडचण नव्हती. या लागवडीबाबतचा कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. घ्ज्ञर क्र. २१४ हे कोणत्या मिळकतीत आहे व सव्हे नंबरमध्ये आहे हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, घर क्र. २१४ हे वडीलोपार्जित आहे. हे खरे नाही की, घर क्र. २१४ हे माझ्या वडीलांनी बांधले. घर क्र. २१४ हे कधीही ग्रामपंचायत सदरी माझ्या वडीलांचे नावे नव्हते. घर क्र. २१४ मी बांधल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी कोर्टात दिलेला नाही. हा घर इमल्याच्या बांधकामाचा खर्चाचा तपशिल मी कोर्टात दिलेला नाही. हे खरे आहे की, घर क्र. २१४ हा पुर्वी गोठा होता. हे खरे आहे की, आमच्या कुटूंबाची गुरे तेथे बांधली जात होती. चेंबूरच्या खोलीच्या विक्रीबाबतची कागदपत्रे मी कोर्टात दाखल केलेली नाहीत. वादीने या खोलीची विक्री केली व त्याचा मोबदला घेतला याबाबतची कागदपत्रे मी कोर्टात दाखल केलेली नाहीत. वादी व प्रतिवादी क्र. २ हे त्यांच्या वडीलांसोबत चेंबुर येथे राहत होते याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी याकामी दिलेला नाही. स.क्र. १९५ हि.क्र. १ व स.नं. १९५ हि.क्र. १० या मिळकतीचे क्षेत्रफळ व चतुःसिमा मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मिळकतीचे स्थानिक नाव सांगितल्यास मी सांगू शकतो. हे खरे आहे की, दावा मिळकतींमध्ये स्थानिक नाव खवळकोंड यात चार मिळकती आहेत. यातील दोन मिळकती पाच ते सहा गुंठयाच्या व इतर एक मिळकत तीन चार गुंठयाच्या आहेत. साक्षीदार स्वतः सांगतो की, खवळकोंड नावाच्या तीन मिळकती आहेत. हे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये खांबड या स्थानिक नाव असलेल्या ठिकाणी एकूण सहा मिळकती आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, या ठिकाणी पाच मिळकती आहेत. या मिळकतींचे क्षेत्रफळ मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, तिसंग या स्थानिक नावाच्या ठिकाणी एकूण तीन मिळकती आहेत. त्या अंदाजे एकूण १० एकरच्या आहेत. दावा मिळकतीमध्ये सातवीन या स्थानिक नावाच्या ठिकाणी दोन मिळकती आहेत. याचे क्षेत्रफळ १० एकर आहे. खवळयाचा टेंबा या स्थानिक नावाच्या ठिकाणच्या जमिनीचे क्षेत्र १० ते १२ एकर आहे. खवळयाचा पन्हळ या स्थानिक नावाच्या ठिकाणच्या जमिनीचे क्षेत्र १० एकर आहे. गडग्याचा कास या स्थानिक नावाच्या ठिकाणचे क्षेत्र ५ ते ६ गुंठे आहे. हे खरे आहे की की, स.नं. १८५ हि.क्र. ३, स.नं. १८६ हि.क्र.१६, स.नं. १८६/३ यसा मिळकतीमध्ये मी कोणतीही लागवड केलेली नाही. स.नं. १९६/५, स.नं. १९७/३३, स.नं.

१९९/१८, स.नं. २०२/२८, स.नं. २०६/३०, स.नं. २०६/३९/४८ या मिळकतीमध्ये मी लागवड केली अथवा नाही हे मी मिळकतीचे स्थानिक नाव सांगितल्याशिवाय सांगू शकत नाही. स.नं. ६३/१४, १६६/२३, १७४/८, १८७/५, १९०/१४, १९०/७, १९१/२, १९३/१, २११/१, ४४/५ या मिळकतीमध्ये मी लागवड केली अथवा नाही हे मी सांगू शकत नाही.

दाव्यातील कैफियतीची माहिती वकीलांना मी दिली अथवा कोणी दिली हे मला आता आठवत नाही. माझ्या कैफियतीमध्ये परिच्छेद क्र. ७ मध्ये काही दावा मिळकतीचे स.नं. व हि.नं. मी नमूद केले होते. हे खरे आहे की, मला ते माहित असल्यामुळे मी वकीलांना नमूद करण्यास सांगितले होते. माझे वडील शंकर सन १९९२ मध्ये मयत झाले. हे खरे नाही की, माझे वडील मयत झाले तेव्हा त्यांच्या नावे घर क्र. २१३ व एक गोठा असे दोन घर इमले होते. हे खरे नाही की, या गोठयाचा वापर वादी व प्रतिवादी हे करत होते. घर क्र. २१४ हे सध्या कोणत्या मिळकतीमध्ये आहे हे मी सांगू शकत नाही. हे खरे नाही की, गोठा हा वडीलोपार्जित असून एकत्र कुटूंबाच्या खर्चाने बांधलेला आहे. हे खरे नाही की, मी एकटयाने गोठा बांधल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालात दिलेला नाही. त्याबाबतचा कोणता कागदोपत्री पुरावा न्यायालयात दिला आहे हे मी सांगू शकत नाही. गोठयाच्या बांधकामाच्या खर्चाचा तपशिल मला सरतपासामध्ये देण्यास मला काही अडचण नव्हती. हे खरे नाही की, दावा मिळकतीमधील झाडे ही सर्व कुटूंबानी लावलेली आहेत.

हे खरे आहे की, माझा भाऊ यशवंत याने मी दावा मिळकतीतील काही झाडांची बेकायदेशीर तोड केल्याबाबतची तक्रार वनक्षेत्रपाल कणकवली येथे केली होती. हे खरे आहे की, अनंत शंकर पडेलकर अशी सही करतो. हे खरे नाही की, त्या तक्रारकामी माझा जबाब घेतला होता. आता साक्षीदाराला कागदयादी सोबत ६७ सोबत दाखल असलेल्या कागदपत्रांपैकी माझा जबाब दाखविला. तो माझा जबाब आहे. त्यावरील सही माझी आहे. (प्रतिवादीच्या वकीलांनी सदरचा कागद झेरॉक्स असल्यामुळे दाखविता येणार नाही अशी हरकत घेतली. वादीच्या वकीलांच्या मते उलट तपास संपल्यानंतर हरकत घेतल्यामुळे त्यांना आता हरकत घेता येणार नाही असे कथन केले.) सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदरचे कागदपत्र हे वनक्षेत्रपाल कणकवली यांच्याकडील सहीसुद नक्कल असल्यामुळे त्या कागदास तात्पुरते **निशाण क्र. ७८** देण्यात येते.

हे खरे नाही की, दावा मिळकतीमधील लागवडीचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी एकत्रीत केला. हे खरे नाही की, शंकर यांची चेंबूरमध्ये खोली होती हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र. २ हे तेथे राहत होते हे मी खोटे सांगत आहे. घर क्र. २१४ हा इमला सन २००७ मध्ये बांधला होता. त्यापुर्वी देखील हा इमला होता. हे खरे नाही की, पुर्वीचा इमला माझ्या वडीलांच्या नावे होता. हे खरे नाही की, तो इमला मी एकटयाने बांधल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीमधील लागवड ही वडीलोपार्जित आहे. हे खरे नाही की, त्यातील झाडे मला बळकाविण्यात यावी म्हणून मी खोटी कैफियत दिली आहे. झाडांच्या लागवडीसाठी आलेल्या खर्चाचा

तपशिल कैफियतीमध्ये देण्यास मला काही अडचण नव्हती. हे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये वादीचा चार आणे हिस्सा आहे. हे खरे नाही की, घर क्र. २१४ हा पुर्वी होता त्याच ठिकाणी आज ही आहे. हे खरे नाही की, ते घर वडीलोपार्जित आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

(श्रीमती एन.बी.घाटगे )

दि. ०९/०१/२०२४.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड